ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम

गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक ३१५ • मंगळवार दि.१५ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## राज्य सरकारकडून दुष्काळाच्या उपाययोजनांची तयारी सुरु

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती



मुंबई/प्रतिनिधी-यंदाच्या मान्सूनमध्ये एल निनोच्या तीव्र प्रभावामुळे महाराष्ट्रात सरासरीपेक्षा कमी आणि असमान पाऊस पडला आहे. त्यामुळे अनेक जिल्ह्यात दुष्काळसदृष्य परिस्थिती निर्माण झाली आहे. विरोधक देखील दुष्कार जाहीर करण्याची मागणी करताना दिसत आहे. अशातच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तीन दिवसांपूर्वीच कमी पावसामुळे राज्यातील १८ जिल्ह्यांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याची माहिती दिली होती. त्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टंचाईच्या व दुष्काळाच्या उपाययोजनाची तयारी सुरू केल्याच माहिती दिली आहे.

राज्यात अनेक ठिकाणी पावसाची जी परिस्थिती आहे, ती समाधानकारक नाही, असा प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हे खरं आहे की राज्यामध्ये पावसाची परिस्थिती फार ताणाची आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये आता पावसाचा ताण ३० दिवसांवर गेलेला आहे. त्या गोष्टीकडे सरकार पूर्ण लक्ष ठेवून आहे. आजही मंत्रिमंडळामध्ये जवळपास अर्धा पाऊणतास त्याच विषयावर चर्चा झाली. प्रत्येक जिल्ह्यातलं सादरीकरण झालं? कुठल्या तालुक्यात काय परिस्थिती आहे? पावसाचा खंड किती आहे? या संदर्भातली सगळी माहिती आम्ही घेतलेली आहे आणि या संदर्भात ज्या काही आपल्याला टंचाईच्या व दुष्काळाच्या उपाययोजना कराव्या लागतात आणि त्याची तयारी आम्ही सुरू केलेली आहे.आपल्याला कल्पना आहे की, एनडीआरएफच्या नॉर्म्सप्रमाणे आपल्याला जो सर्व्हे करावा लागतो, तो ५ ऑक्टोबरनंतर करावा लागतो. त्याच्या आधीचा सर्वे हा मदती करता पात्र होत नाही. पण आपण ५ ऑक्टोबर करता न थांबता बाकी उपाययोजनाची प्राथमिक माहिती घेण्याची आम्ही सुरुवात केलेली आहे. ५ ऑक्टोबरपासून जो ऑफिशियल सर्व्हे आहे, तो देखील पुढच्या ८-१० दिवसात आम्ही करू आणि कुठल्याही शेतकऱ्यांना आम्ही वाऱ्यावर सोडणार नाही. राज्य सरकार पूर्ण ताकतीने **पान ४ वर**

## परवानगीची प्रतीक्षा न करता जरांगे पाटील मुंबईकडे रवाना

### आझाद मैदानातील उपोषणावर ठाम; सरकारसमोर नवे आव्हान

जालना : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी निर्णायक आमरण उपोषणाचा निर्धार केलेले मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील अखेर मंगळवारी (१५ सप्टेंबर) मुंबईच्या दिशेने रवाना झाले. आंतरवाली सराटी येथून त्यांचा ताफा मुंबईकडे निघाला असून, त्यांच्यासोबत मोठ्या संख्येने समर्थक आंदोलकांची वाहनेही रवाना झाली आहेत.



मुंबईतील आझाद मैदानावर १९ सप्टेंबर रोजी उपोषण करण्याचा निर्धार जरांगे पाटील यांनी व्यक्त केला आहे. मात्र, आझाद मैदान पोलिसांकडून दोन वेळा परवानगी नाकारण्यात आल्याने आता सरकार आणि आंदोलक यांच्यातील संघर्षाची दिशा काय असेल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. मुंबईला रवाना होण्यापूर्वी जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथील हनुमान मंदिरात दर्शन घेतले. यावेळी महिलांनी त्यांचे औक्षण करून त्यांना निरोप दिला. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी मराठा समाजाच्या मागण्यांवरून सरकारवर जोरदार टीका केली. सगळ्यांनी मराठा समाजाला फसवले आहे, असा आरोप त्यांनी केला. मराठा समाजाने एकजुटीने राहावे, शांतता राखावी आणि आंदोलनाला कोणतेही गालबोट लागू देऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले. आपला लढा मराठा समाजाच्या आणि समाजातील तरुणांच्या भविष्यासाठी सुरू असल्याचे सांगत जरांगे पाटील यांनी सरकारसमोर शरण जाणार नसल्याचा इशारा दिला. समाजाच्या लेकरांच्या कल्याणासाठी हा लढा असून, मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली. मुंबईकडे निघालेल्या त्यांच्या ताफ्याचा पहिला मुक्काम पाटोदा येथे होणार असल्याचे सांगण्यात आले.

मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण करण्यासाठी जरांगे पाटील यांच्या समर्थकांकडून पोलिसांकडे परवानगी मागण्यात आली होती. मात्र, गेल्या दोन दिवसांत दोन वेळा आझाद मैदान पोलिसांनी हा अर्ज फेटाळला आहे. त्यानंतर तिसऱ्यांदा परवानगीसाठी अर्ज दाखल करण्यात आला असून त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. निर्णयाची प्रतीक्षा असतानाच जरांगे पाटील यांनी मुंबईचा रस्ता धरल्याने प्रशासनापुढेही पेच निर्माण झाला आहे.

## कॉ.अनंतराव नागापूरकर प्रतिष्ठानतर्फे १७ रोजी पुरस्कार वितरण सोहळा



नांदेड/प्रतिनिधी-प्रख्यात कामगार नेते तथा स्वातंत्र्यसैनिक दिवंगत कॉ.अनंतराव नागापूरकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ कार्यरत असलेल्या कॉ.अनंतराव नागापूरकर प्रतिष्ठान, नांदेड आणि सायं दैनिक नांदेड वार्ता यांच्या संयुक्त विद्यमाने विशेषांक प्रकाशन तसेच विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता कुसुम सभागृह, व्ही.आय.पी. रोड, नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन युवा नेते तथा वंचित बहुजन आघाडीचे नेते मा.सुजात आंबेडकर यांच्या शुभहस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा.सीए. डॉ. प्रवीण पाटील राहणार असून नांदेड लोकसभा मतदारसंघाचे मा.खा. रवींद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दै. प्रजावाणीचे संपादक मा.शांतनु डोईफोडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात जीवनगौरव पुरस्कार माजी अध्यक्ष, सचखंड गुरुद्वारा बोर्ड, नांदेड तथा माजी नगरसेवक मा.लड्डूसिंघजी महाजन आणि माजी नगराध्यक्ष, न.पा. किनवट मा.इसाखान सरदारखान यांना प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच पत्रकारिता पुरस्कार पत्रकार, दै.श्रमिक एकजूट, लोहा येथील मा. रत्नाकर महाबळे यांना देण्यात येणार आहे. उत्कृष्ट संघटक पुरस्कार मा. कॉ. मीना हटकर (बिडी व सफाई कामगार संघटना, नांदेड), मा. कॉ. प्रकाश बेलकवाड (ग्राम रोजगार सेवक संघटना, नांदेड) आणि मा. कॉ. वैशाली धुळे (कंत्राटी सफाई कामगार संघटना, नांदेड) यांना प्रदान करण्यात येणार आहेत.या पुरस्कार सोहळ्यास नागरिक, कामगार, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सायं दैनिक नांदेड वार्ताचे संपादक कॉ. प्रदीप नागापूरकर, उपाध्यक्ष फारूक अहमद, कॉ. विजय गाभणे, सचिव राज गोडबोले, सहसचिव कॉ. शिवाजी फुलवळे, बालाजी पवार, कॉ.गणेश संदुपटला यांनी केले आहे.

## ३५ लाख रुपयांची फसवणूक प्रकरणी व्यापारी मनिष अग्रवाल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील प्रतिष्ठित व्यापारी मनिष ईश्वरदास अग्रवाल यांच्याविरुद्ध ३५ लाख रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रस्ते सुधारणा कार्यक्रम अंतर्गत कौठा,नांदेड येथे रस्त्याचे काम सुरु आहे. रस्त्याच्या कामासाठी लागणाऱ्या सिमेंटची ऑर्डर इशप्रितकौर तेजविंदरसिंघ खालसा यांनी व्यापारी मनिष अग्रवाल यांच्याकडे दिली होती. सिमेंट खरेदीसाठी त्यांनी मनिष अग्रवाल यांच्या खात्यात ३५ लाख रुपये दि.१५ मे २०२६ रोजी जमा केले होते. अग्रवाल यांनी इशप्रितकौर खालसा यांना ऑर्डर प्रमाणे सिमेंट दिली नाही. पैसे परत मागीतले असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच इशप्रितकौर खालसा यांनी नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन गाठून रितसर फिर्याद दाखल केली. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात व्यापारी मनिष ईश्वरदास अग्रवाल रा.यशोविहार कॉलनी,नांदेड यांच्या विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील फौजदार बारुळे हे करीत आहेत. यापूर्वीही मनिष अग्रवाल यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे.

प्रेरणास्थान

कॉ.अनंतराव नगापूरकर

हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर

प्रति, मा. श्री. ..........................................
सस्नेह नमस्कार,

कॉ. अनंतराव नागापूरकर प्रतिष्ठान, नांदेड
व
सायं दैनिक नांदेड वार्ता
विशेषाकांचा प्रकाशन सोहळा
कॉ.अनंतराव नागापूरकर प्रतिष्ठानच्या वतीने
प्रदान करण्यात येणाऱ्या जीवन गौरव, पत्रकारिता,
प्रेरणादायी संघटक पुरस्कार प्रदान सोहळा...

रौप्य महोत्सव २५

शुभहस्ते
मा.सुजात आंबेडकर
युवा नेते, वंचित बहुजन आघाडी

प्रमुख उपस्थिती
मा.खा.रविंद्र चव्हाण
नांदेड लोकसभा मतदार संघ

कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा.सीए. डॉ.प्रवीण पाटील
अध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड

प्रमुख पाहुणे
मा.शंतनु डोईफोडे
संपादक, दै.प्रजावाणी

जीवन गौरव पुरस्कार
मा.लड्डूसिंघजी महाजन
माजी अध्यक्ष, सचखंड गुरुद्वारा बोर्ड, नांदेड तथा माजी नगरसेवक
मा.इसाखान सरदाखान
माजी नगराध्यक्ष न.पा. किनवट

पत्रकारिता पुरस्कार
मा.रत्नाकर महाबळे
पत्रकार, दै. श्रमिक एकजूट लोहा

उत्कृष्ट संघटक पुरस्कार
मा.कॉ.मीना हटकर
बिडी व सफाई कामगार संघटना, नांदेड
मा.कॉ. प्रकाश बैलकवाड
ग्राम रोजगार सेवक संघटना, नांदेड
मा.कॉ. वैशाली धुळे
कंत्राटी सफाई कामगार संघटना, नांदेड

यांच्या उपस्थितीत मान्यवरांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.
तरी कृपया आपण या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे, ही विनंती.

विनित
ॲड.कॉ.प्रदीप नागापूरकर
अध्यक्ष, कॉ. अनंतराव नागापूरकर प्रतिष्ठान
संपादक, सायं दै.नांदेड वार्ता
फारुख अहमद
उपाध्यक्ष
राज गोडबोले
सचिव
कॉ.विजय गाभणे
सदस्य
बालाजी पवार
कोषाध्यक्ष
शिवाजी फुलवळे
सह सचिव
अविनाश पाटील
सह संपादक

स्थळ : 'कुसुम सभागृह' व्हीआयपी रोड, नांदेड । दि.१७ सप्टेंबर,२०२६ : वेळ : सकाळी ११.३० वा.

## मुखेड,कंधारमध्ये दुष्काळ जाहीर करण्यासाठी शेतकऱ्यांचा तहसीलवर मोर्चा



मुखेड/प्रतिनिधी-मुखेड-कंधार तालुक्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये अनुदान द्यावे, तसेच दुष्काळाशी संबंधित विविध मागण्या तातडीने मंजूर कराव्यात, या मागण्यांसाठी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी मुखेड तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

दि. १५ सप्टेंबर रोजी उपजिल्हाधिकारी अनुप पाटील, मुखेडचे तहसीलदार अभयराय नंजुडे आणि कंधारचे तहसीलदार रामेश्वर गोरे यांच्याकडे शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले. शेतकरी मोठ्या **पान ४ वर**

## 'एसजीएस'च्या गलथान कारभाराचा विद्यार्थ्यांना फटका;स्पॉट राऊंडमध्ये संधी हुकली!

### दुपारी दोनची प्रक्रिया पावणेचारला सुरु;अपुऱ्या वेळेमुळे अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित



नांदेड/प्रतिनिधी-अभियांत्रिकी प्रवेशासाठी पूर्व परीक्षा घेणाऱ्या सीईटीकडून स्पॉट ॲडमिशनच्या दुसऱ्या राऊंडसाठी सायंकाळी पाच वाजेपर्यंतची वेळ निश्चित करण्यात आली होती. ही प्रवेश प्रक्रिया नेमकी कोणत्या वेळी सुरू करायची, याची जबाबदारी संबंधित महाविद्यालय प्रशासनावर होती. मात्र, श्री गुरुगोविंदसिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालय प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभाराचा फटका विद्यार्थी आणि पालकांना बसला.

महाविद्यालयात १२ जागा रिक्त होत्या. तसेच आपल्या संस्थेतून अन्य संस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमुळे निर्माण झालेल्या रिक्त जागांचाही विचार करून प्रवेश प्रक्रिया राबविणे अपेक्षित होते. चांगल्या शाखेत प्रवेश मिळावा या उद्देशाने अनेक पालक व विद्यार्थी दूरवरच्या महाविद्यालयांत प्रवेश घेऊन बसले होते. मात्र, त्याच शाखेतील काही जागा नांदेडमध्ये रिक्त असल्याचे समोर आल्याने **पान ४ वर**

## आरक्षणाचा प्रश्न सुटणार कधी?

महाराष्ट्रात आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आंदोलन कोणत्याही परिस्थितीत करणारच, अशी त्यांची भूमिका असल्याने सरकारसमोर पुन्हा एकदा मोठे आव्हान उभे राहिले आहे. दुसरीकडे ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या हक्काबाबत निर्माण झालेली चिंता आणि दोन्ही समाजांमध्ये वाढत चाललेली अस्वस्थता पाहता हा प्रश्न केवळ राजकीय राहिलेला नाही; तो महाराष्ट्रातील लाखो तरुणांच्या भविष्याशी जोडला गेला आहे. आरक्षणाचा प्रश्न न्याय्य पद्धतीने आणि कायमस्वरूपी कधी सुटणार, हा आजच्या तरुणाईचा सरकारला थेट सवाल आहे. आरक्षणाची मागणी ही केवळ सरकारी नोकरीतील काही जागांसाठीची स्पर्धा नाही. सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणातून पुढे येण्यासाठी संधी मिळावी, या व्यापक भूमिकेतून आरक्षणाची संकल्पना पुढे आली. मात्र आज परिस्थिती अशी आहे की, आरक्षण मिळाले तरी सरकारी नोकऱ्या किती उरल्या आहेत?, हा मूलभूत प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. मोठ्या प्रमाणावर सरकारी क्षेत्राचे खासगीकरण होत आहे. अनेक शासकीय उपक्रम, सेवा आणि कामे खासगी क्षेत्राकडे जात आहेत. त्यामुळे सरकारी नोकरीच्या संधी कमी होत असताना आरक्षणाच्या टक्केवारीवरून समाजात संघर्ष निर्माण होणे, हे एक प्रकारचे विरोधाभासी चित्र आहे.एका बाजूला आरक्षणासाठी तरुण रस्त्यावर उतरतो आणि दुसऱ्या बाजूला नोकरभरतीसाठीही तोच तरुण आंदोलन करतो. परीक्षा घेतल्या जातात, शुल्क आकारले जाते, वर्षानुवर्षे तयारी केली जाते; पण पेपरफुटी, गैरप्रकार किंवा परीक्षा प्रक्रियेतील अनियमिततेच्या बातम्या समोर आल्या की या तरुणांच्या स्वप्नांवर पाणी फिरते. आरक्षण मिळविण्यासाठी संघर्ष करणाऱ्या तरुणाला आधी परीक्षा पारदर्शक हवी आहे आणि त्यानंतर उपलब्ध असलेल्या नोकरीच्या संधीही हव्या आहेत. या दोन्ही गोष्टींचा विचार न करता केवळ आरक्षणाच्या आकड्यांवर चर्चा करणे म्हणजे समस्येच्या मुळाशी न जाणे होय.शिक्षणाच्या बाबतीतही परिस्थिती वेगळी नाही. खासगी शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेताना विद्यार्थ्याला मोठी फी भरावी लागते. शासनाच्या योजनांनुसार लाभ मिळणार असला तरी डीबीटीच्या माध्यमातून रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होण्यासाठी वेळ लागतो. म्हणजे आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या कुटुंबाला आधी पैसा उभा करावा लागतो आणि नंतर शासनाच्या मदतीची प्रतीक्षा करावी लागते. गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ही व्यवस्था अनेकदा शिक्षणाच्या संधीसमोरच आर्थिक अडथळा उभा करते. शासनाने लाभ मंजूर केला म्हणजे समस्या संपली असे होत नाही; तो लाभ वेळेवर आणि प्रत्यक्ष मिळणे अधिक महत्त्वाचे आहे.आजचा तरुण एका विचित्र कोंडीत सापडला आहे. शिक्षण महाग झाले आहे, सरकारी नोकऱ्या कमी होत आहेत, खासगी क्षेत्रात स्पर्धा प्रचंड आहे, परीक्षांमध्ये गैरप्रकाराच्या तक्रारी आहेत आणि आरक्षणाच्या प्रश्नावर समाजामध्ये संघर्ष वाढत आहे. मग त्याने करायचे तरी काय? त्याच्या हातात पदवी आहे, पण रोजगाराची हमी नाही; आरक्षणाची मागणी आहे, पण उपलब्ध संधी कमी आहेत; परीक्षा देण्याची तयारी आहे, पण परीक्षा व्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत होत आहे.सरकारने या प्रश्नाकडे केवळ आंदोलने थांबविण्याच्या दृष्टिकोनातून पाहू नये. मराठा, ओबीसी किंवा इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाच्या मागण्यांकडे न्यायाच्या चौकटीतून पाहिले पाहिजे. त्याचबरोबर सरकारी नोकरभरतीला गती, परीक्षा प्रक्रियेत शंभर टक्के पारदर्शकता, पेपरफुटीला कठोर आळा, खासगी क्षेत्रातील रोजगारनिर्मिती आणि विद्यार्थ्यांना डीबीटीचा लाभ वेळेत मिळेल अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. आरक्षणाचा प्रश्न सोडवायचा असेल तर केवळ किती टक्के आरक्षण द्यायचे यावर निर्णय घेऊन चालणार नाही. शिक्षण, रोजगार आणि सामाजिक न्याय या तिन्हींचा समन्वय साधणारे धोरण आवश्यक आहे. कारण आरक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या तरुणाला शेवटी सन्मानाने जगण्यासाठी रोजगारच हवा आहे.मुंबई आंदोलनाचा निर्धार व्यक्त करणारे मनोज जरांगे पाटील असोत किंवा आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरणारी कोणत्याही समाजातील तरुणाई असो, त्यांच्या आंदोलनामागील अस्वस्थता समजून घेणे ही सरकारची जबाबदारी आहे. आंदोलन थांबविण्यापेक्षा आंदोलनाची वेळच येणार नाही, अशी न्याय्य आणि विश्वासार्ह व्यवस्था निर्माण करणे हे खरे प्रशासनाचे यश ठरेल.आज महाराष्ट्रातील तरुणाई रस्त्यावर आहे. तिच्या हातात दगड नको, पुस्तक हवे; आंदोलनाची घोषणा नको, रोजगाराची संधी हवी; पेपरफुटीची बातमी नको, पारदर्शक परीक्षा हवी. सरकारने या आवाजाकडे वेळीच लक्ष दिले नाही तर आरक्षणाचा प्रश्न केवळ आरक्षणापुरता राहणार नाही; तो विश्वासाचा प्रश्न बनेल. म्हणूनच सरकारने आता एकच प्रश्न स्वतःला विचारावा आरक्षणाचा प्रश्न सुटणार कधी? आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे, आरक्षण मिळाल्यानंतर तरुणांसाठी संधी उरणार किती?

# भारतीय लोकशाही आणि नागरिकांची उदासीनता

डॉ.राजेंद्र बगाटे

दरवर्षी १५ सप्टेंबर हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन म्हणून साजरा केला जातो. लोकशाही ही केवळ शासनव्यवस्था नसून स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, मानवी प्रतिष्ठा आणि जनसहभाग यांवर आधारलेली जीवनपद्धती आहे. लोकशाहीमध्ये जनता ही सत्तेचा अंतिम स्रोत मानली जाते. नागरिकांना आपल्या प्रतिनिधींची निवड करण्याचा अधिकार असतो आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींनी जनतेपुढे उत्तरदायी राहणे अपेक्षित असते. भारताने स्वातंत्र्यानंतर लोकशाही प्रजासत्ताकाचा स्वीकार करून विविधतेने नटलेल्या विशाल देशात लोकशाही व्यवस्था यशस्वीपणे रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, स्वतंत्र निवडणूक व्यवस्था, संविधानिक संस्था आणि कायद्याचे राज्य या आधारांवर भारतीय लोकशाहीची वाटचाल झाली. मात्र, लोकशाहीच्या या प्रवासात एक गंभीर आव्हान सातत्याने जाणवते ते म्हणजे नागरिकांची वाढती उदासीनता होय. मतदानापुरते नागरिकत्व मर्यादित राहणे, सार्वजनिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे, शासनाच्या कामकाजाची माहिती न घेणे, चुकीच्या माहितीवर सहज विश्वास ठेवणे आणि आपल्या अधिकारांइतकीच कर्तव्येही महत्त्वाची आहेत याची जाणीव कमी होणे, या प्रवृत्ती लोकशाहीसाठी चिंताजनक आहेत. लोकशाही मजबूत करण्यासाठी सक्षम संस्था जितक्या आवश्यक आहेत, तितकाच जागरूक, विवेकी आणि सक्रिय नागरिकही आवश्यक आहे.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान राजकीय अधिकार दिले आहेत. धर्म, जात, भाषा, लिंग, आर्थिक स्थिती किंवा सामाजिक पार्श्वभूमी यांचा विचार न करता प्रौढ नागरिकाला मतदानाचा अधिकार देण्यात आला. हा अधिकार केवळ शासन निवडण्याचे साधन नाही, तर नागरिकाच्या राजकीय अस्तित्वाची मान्यता आहे. सामान्य माणसाचे मत आणि सत्तेच्या सर्वोच्च स्तरावरील व्यक्तीचे मत मतदानाच्या प्रक्रियेत समान मूल्याचे असते. हीच राजकीय समानता लोकशाहीचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. परंतु मतदानाचा अधिकार असूनही जर नागरिकाने निवडणुकीच्या दिवशी मतदान करण्यापलीकडे सार्वजनिक जीवनाशी संबंध ठेवला नाही, तर लोकशाहीतील त्याचा सहभाग अपुरा ठरतो. लोकशाहीमध्ये नागरिक हा केवळ मतदार नसतो; तो शासनाचा निरीक्षक, प्रश्न विचारणारा, सहभागी आणि उत्तरदायित्वाची मागणी करणारा घटक असतो. त्यामुळे नागरिकांची उदासीनता ही केवळ वैयक्तिक बाब नसून लोकशाहीच्या गुणवत्तेशी संबंधित प्रश्न आहे. नागरिकांच्या उदासीनतेचे सर्वांत स्पष्ट उदाहरण म्हणजे सार्वजनिक प्रश्नांपासून दूर राहण्याची प्रवृत्ती होय. आपल्या परिसरातील रस्ते खराब असतील, पाणीपुरवठा अनियमित असेल, सार्वजनिक आरोग्यसेवा अपुरी असेल, शाळांमध्ये सुविधा कमी असतील किंवा सार्वजनिक निधीच्या वापराबाबत प्रश्न निर्माण होत असतील, तरी अनेक नागरिक त्याकडे हे सरकारचे काम आहे या भावनेने पाहतात. शासनाचे काम जनतेसाठी असले तरी शासनाला योग्य प्रश्न विचारणे आणि प्रशासनाकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा करणे हे नागरिकांचेही कर्तव्य आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील प्रश्न समजून घेऊन ग्रामसभा, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक सुनावण्या आणि उपलब्ध घटनात्मक व कायदेशीर मार्गांचा वापर केला तर लोकशाही तळागाळापर्यंत अधिक प्रभावी होऊ शकते. मात्र, आपण काही केले तरी काय बदलणार? अशी मानसिकता लोकशाहीतील सक्रिय सहभागाला अडथळा निर्माण करते. मतदानाबाबतची उदासीनता हा देखील गंभीर विषय आहे. मतदान हा प्रत्येक पात्र नागरिकाचा महत्त्वपूर्ण अधिकार आहे; परंतु काही नागरिक मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राकडे जाण्याऐवजी आपल्या दैनंदिन कामाला किंवा वैयक्तिक सोयीला अधिक महत्त्व देतात. काही जण राजकारणाबद्दल नाराजी व्यक्त करतात, परंतु त्या नाराजीचे रूप मतदानातून किंवा घटनात्मक सहभागातून व्यक्त करीत नाहीत. सर्वच उमेदवार सारखे आहेत, माझ्या एका मताने काय फरक पडणार? किंवा राजकारणात काहीच बदलत नाही अशा भावना लोकशाहीतील निष्क्रियता वाढवतात. प्रत्यक्षात प्रत्येक मत हे लोकशाहीच्या निर्णयप्रक्रियेतील एक महत्त्वाचे साधन आहे. उमेदवारांची माहिती घेणे, त्यांच्या सार्वजनिक भूमिकेचा अभ्यास करणे आणि विवेकपूर्वक मतदान करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. मतदान न करण्याची उदासीनता ही अप्रत्यक्षपणे इतरांच्या निर्णयाला अधिक प्रभावी बनवू शकते.

नागरिकांच्या उदासीनतेमागे राजकीय प्रक्रियेबद्दल निर्माण झालेला अविश्वास हे एक कारण असू शकते. राजकारणातील भ्रष्टाचार, आश्वासनांची पूर्तता न होणे, वाढता निवडणूक खर्च, राजकीय संघर्षातील कटुता किंवा सार्वजनिक संस्थांवरील अविश्वास यामुळे काही नागरिक राजकीय प्रक्रियेपासून दूर जातात. मात्र, लोकशाहीतील त्रुटींवर नाराजी व्यक्त करण्याचा सर्वांत प्रभावी मार्ग म्हणजे लोकशाही प्रक्रियेपासून दूर जाणे नव्हे, तर त्या प्रक्रियेत अधिक सक्रियपणे सहभागी होणे हा आहे. चांगले उमेदवार निवडणे, धोरणांवर चर्चा करणे, प्रश्न विचारणे, लोकप्रतिनिधींशी संवाद साधणे आणि आवश्यकतेनुसार शांततामय व संविधानिक मार्गाने जनमत तयार करणे यामुळे लोकशाहीतील सकारात्मक बदल शक्य होतात. उदासीनता बदल घडवून आणत नाही; जागरूक सहभागच बदलाचे माध्यम बनतो. लोकशाहीतील नागरिकांची उदासीनता ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसते. अनेक नागरिकांना संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्ये, स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार, शासनाच्या विविध योजनांची माहिती किंवा नागरिकांना उपलब्ध असलेल्या कायदेशीर मार्गांची पुरेशी माहिती नसते. माहितीचा अभाव हा लोकशाहीतील सहभाग कमी करणारा महत्त्वाचा घटक आहे. नागरिकांना आपले अधिकार आणि कर्तव्ये समजली तर ते शासनव्यवस्थेत अधिक प्रभावीपणे सहभागी होऊ शकतात. म्हणून लोकशाही साक्षरता ही सामान्य साक्षरतेइतकीच महत्त्वाची आहे. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि प्रसारमाध्यमांनी नागरिकांना संविधान, लोकशाही प्रक्रिया आणि सार्वजनिक संस्थांविषयी माहिती देण्याचे कार्य अधिक प्रभावीपणे करणे आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात नागरिकांच्या उदासीनतेचे स्वरूप काहीसे बदलले आहे. सामाजिक माध्यमांवर राजकीय विषयांवर मोठ्या प्रमाणावर चर्चा होते. अनेक नागरिक आपले मत व्यक्त करतात, सरकारच्या धोरणांवर प्रतिक्रिया देतात आणि विविध सार्वजनिक प्रश्नांवर भूमिका घेतात. मात्र, सामाजिक माध्यमांवरील सक्रियता आणि प्रत्यक्ष लोकशाही सहभाग यांमध्ये फरक आहे. एखाद्या विषयावर प्रतिक्रिया देणे, संदेश पुढे पाठविणे किंवा एखाद्या छायाचित्रावर मत व्यक्त करणे एवढ्याने लोकशाही सहभाग पूर्ण होत नाही. प्रत्यक्ष जीवनातील सार्वजनिक प्रश्नांमध्ये सहभागी होणे, सत्य माहिती मिळविणे, प्रशासनाकडे प्रश्न मांडणे आणि सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी योगदान देणे आवश्यक आहे. आभासी जगातील सक्रियता वास्तविक लोकशाही सहभागाची जागा घेऊ शकत नाही. खोटी माहिती आणि अफवांचा प्रसार ही नागरिकांच्या उदासीनतेशी जोडलेली आणखी एक गंभीर समस्या आहे. माहितीचा स्रोत तपासण्याची सवय नसल्यास नागरिक सहजपणे चुकीच्या प्रचाराला बळी पडू शकतात. विशेषतः निवडणुकीच्या काळात अर्धसत्य, दिशाभूल करणारे संदेश आणि बनावट माहिती लोकमतावर परिणाम करू शकतात. एखादी माहिती आपल्या मताशी जुळते म्हणून ती खरी आहे असे मानणे ही लोकशाहीसाठी धोकादायक प्रवृत्ती आहे. विवेकी नागरिकाने प्रत्येक माहितीचा स्रोत तपासला पाहिजे, अधिकृत माहितीशी तिची पडताळणी केली पाहिजे आणि संशयास्पद माहिती पुढे पाठविणे टाळले पाहिजे. डिजिटल साक्षरता ही आज जबाबदार नागरिकत्वाची अत्यावश्यक अट बनली आहे. नागरिकांची उदासीनता आणि सामाजिक असमानता यांचाही जवळचा संबंध आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण, वंचित किंवा उपेक्षित नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जगण्याच्या प्रश्नांमध्ये इतके गुंतून राहावे लागते की व्यापक सार्वजनिक प्रश्नांमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांच्याकडे वेळ, साधने किंवा माहिती उपलब्ध नसते. त्यामुळे लोकशाहीचा सहभाग केवळ औपचारिक अधिकार देऊन पूर्ण होत नाही. शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सुरक्षा आणि मूलभूत सुविधा यांचा विस्तार झाला तर नागरिकांचा सार्वजनिक जीवनातील सहभागही वाढतो. सामाजिक न्याय आणि लोकशाही सहभाग यांचे नाते त्यामुळे अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजातील वंचित घटकांचा आवाज निर्णयप्रक्रियेत पोहोचविणे ही लोकशाहीची जबाबदारी आहे. महिलांच्या लोकशाही सहभागाकडेही या संदर्भात पाहणे आवश्यक आहे. महिलांना मतदानाचा अधिकार मिळाल्यानंतरही त्यांच्या राजकीय सहभागाचा विस्तार होण्यासाठी अनेक सामाजिक अडथळे पार करावे लागले. घरगुती जबाबदाऱ्या, सामाजिक रूढी, आर्थिक अवलंबित्व, राजकीय क्षेत्रातील असुरक्षितता आणि निर्णयप्रक्रियेत मर्यादित प्रतिनिधित्व यांमुळे अनेक महिलांचा सार्वजनिक सहभाग अपेक्षेइतका प्रभावी होत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्यामुळे तळागाळातील लोकशाहीला नवी दिशा मिळाली आहे. मात्र, प्रतिनिधित्वासोबत निर्णयक्षमता आणि स्वायत्तता वाढणेही आवश्यक आहे. महिलांचा आवाज सार्वजनिक धोरणांमध्ये प्रभावीपणे प्रतिबिंबित झाला तर लोकशाही अधिक समताधिष्ठित बनेल. युवकांची उदासीनता हीदेखील चिंतेची बाब आहे. युवक हा देशाचा मोठा सामाजिक घटक असून लोकशाहीच्या भवितव्यात त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक युवक सामाजिक माध्यमांवर सक्रिय असले तरी प्रत्यक्ष सामाजिक आणि सार्वजनिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग मर्यादित राहतो. राजकीय प्रश्नांचा सखोल अभ्यास करण्याऐवजी क्षणिक लोकप्रियतेवर आधारित मत तयार होणे ही धोकादायक बाब आहे. युवकांनी संविधानाचा अभ्यास करणे, विविध राजकीय विचार समजून घेणे, सार्वजनिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास करणे आणि सामाजिक कार्यात सहभागी होणे आवश्यक आहे. चर्चासत्रे, संविधान दिनाचे उपक्रम, सामाजिक सेवा आणि स्थानिक प्रश्नांवरील प्रकल्प यांमधून युवकांमध्ये लोकशाहीची जाणीव विकसित करता येऊ शकते. लोकशाहीमध्ये विरोधी मताचा सन्मान करणे हा सक्रिय नागरिकत्वाचा महत्त्वाचा भाग आहे. मात्र, नागरिकांच्या उदासीनतेसोबतच अंधसमर्थनाची प्रवृत्तीही लोकशाहीसाठी धोकादायक आहे. एखादा राजकीय पक्ष किंवा नेता आपल्या आवडीचा आहे म्हणून त्याच्या प्रत्येक निर्णयाला समर्थन करणे ही लोकशाही वृत्ती नाही. त्याचप्रमाणे विरोधी पक्ष किंवा वेगळ्या विचारसरणीतील प्रत्येक भूमिकेला चुकीचे ठरविणेही विवेकपूर्ण नागरिकत्वाचे लक्षण नाही. नागरिकांनी व्यक्तीपेक्षा धोरणे, विचार आणि सार्वजनिक कामगिरी यांचे मूल्यमापन केले पाहिजे. लोकशाहीमध्ये प्रश्न विचारणे हा विरोधाचा नव्हे तर जबाबदार नागरिकत्वाचा भाग आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून नागरिकांच्या उदासीनतेवर प्रभावीपणे मात करता येऊ शकते. ग्रामसभा, नगरपालिका सभा आणि स्थानिक विकास प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. गावातील पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, रोजगार आणि पर्यावरणाशी संबंधित प्रश्न नागरिकांनी सामूहिकपणे मांडले तर प्रशासनावर सकारात्मक दबाव निर्माण होतो. सार्वजनिक निधीचा वापर, विकासकामांची गुणवत्ता आणि योजनांचा लाभ याबाबत माहिती घेण्याचा नागरिकांना अधिकार आहे. स्थानिक पातळीवर सक्रिय नागरिकत्वाची सवय लागली तर राष्ट्रीय पातळीवरील लोकशाही सहभागही अधिक अर्थपूर्ण होतो.

लोकशाहीतील नागरिकांची उदासीनता दूर करण्यासाठी शिक्षण आणि मूल्यसंस्कार यांना विशेष महत्त्व आहे. लोकशाहीचे शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकातील धड्यापुरते मर्यादित राहता कामा नये. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष चर्चेत सहभागी करून घेणे, त्यांना प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन देणे, मतभिन्नतेचा आदर शिकविणे आणि संविधानिक मूल्यांचा व्यवहारात उपयोग करून दाखविणे आवश्यक आहे. घर, शाळा, महाविद्यालय आणि समाज या सर्व स्तरांवर संवादाची संस्कृती विकसित झाली तर लोकशाही वृत्ती अधिक मजबूत होईल. स्वतःचे मत मांडताना दुसऱ्याचे मत ऐकण्याची तयारी ही लोकशाहीची मूलभूत शिस्त आहे.

नागरिकांच्या उदासीनतेवर मात करण्यासाठी शासन आणि सार्वजनिक संस्थांचीही जबाबदारी आहे. शासनाची माहिती सहज उपलब्ध असणे, सार्वजनिक सेवांमध्ये पारदर्शकता असणे, नागरिकांच्या तक्रारींवर वेळेवर कार्यवाही होणे आणि प्रशासन नागरिकांशी संवाद साधणारे असणे आवश्यक आहे. नागरिकांना वारंवार अनुभव येत असेल की त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होते, तर शासनावरील विश्वास कमी होऊ शकतो. त्यामुळे पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासन नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी आवश्यक आहे. लोकशाहीमध्ये नागरिकांनी शासनाला प्रश्न विचारणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच शासनाने त्या प्रश्नांना उत्तर देणेही महत्त्वाचे आहे. भारतीय लोकशाहीची शक्ती तिच्या व्यापक लोकसहभागात आहे. भारतातील निवडणुकांमध्ये कोट्यवधी नागरिक सहभागी होतात, विविध सामाजिक घटक राजकीय प्रक्रियेत प्रतिनिधित्व मिळवितात आणि शांततामय मार्गाने सत्तांतर घडते, ही मोठी उपलब्धी आहे. परंतु लोकशाहीची गुणवत्ता केवळ निवडणुकांच्या यशाने मोजता येत नाही. नागरिक वर्षभर सार्वजनिक प्रश्नांमध्ये किती सहभागी होतात, शासनाच्या कामकाजाबाबत किती जागरूक असतात, संविधानिक मूल्यांचा किती आदर करतात आणि सामाजिक न्यायासाठी किती संवेदनशील असतात, यावरही लोकशाहीचे यश अवलंबून असते. आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाच्या निमित्ताने त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे की आपण केवळ मतदार आहोत की सक्रिय नागरिक? आपल्या परिसरातील सार्वजनिक प्रश्नांची आपल्याला माहिती आहे का? आपण लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारतो का? शासनाच्या योजनांची माहिती घेतो का? चुकीची माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासतो का? मतभिन्न असलेल्या व्यक्तीच्या मताचा सन्मान करतो का? संविधानाने दिलेल्या अधिकारांसोबत आपल्या कर्तव्यांची जाणीव ठेवतो का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे भारतीय लोकशाहीच्या वर्तमानाचे चित्र स्पष्ट करू शकतात. लोकशाही ही केवळ संसदेत किंवा विधानसभेत अस्तित्वात नसते. ती नागरिकांच्या विचारांत, वर्तनात आणि दैनंदिन कृतीत जिवंत राहते. घरात प्रत्येकाचे मत ऐकले जाते तेव्हा, शाळेत प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन दिले जाते तेव्हा, समाजात भिन्न मतांचा आदर केला जातो तेव्हा आणि सार्वजनिक संस्थांना जबाबदार धरले जाते तेव्हा लोकशाही मजबूत होते. नागरिकांची उदासीनता वाढली तर लोकशाहीच्या संस्था असूनही तिचा आत्मा दुर्बल होऊ शकतो. उलट, जागरूक आणि सक्रिय नागरिक असतील तर कोणतीही लोकशाही अधिक सक्षम बनू शकते.

१५ सप्टेंबरचा आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा म्हणूनच केवळ लोकशाहीचा गौरव करण्याचा दिवस नसून तिच्या आरोग्याचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. भारतीय लोकशाहीसमोर अनेक आव्हाने आहेत; परंतु त्यावर मात करण्याची क्षमता भारतीय समाजातही आहे. नागरिकांनी मतदानाचा अधिकार जबाबदारीने वापरला, सार्वजनिक प्रश्नांमध्ये सक्रिय सहभाग घेतला, संविधानिक मूल्यांचे पालन केले, खोटी माहिती आणि द्वेषपूर्ण प्रचाराला नकार दिला, वंचितांच्या अधिकारांविषयी संवेदनशीलता दाखविली आणि शासनाला सातत्याने उत्तरदायी ठेवले तर लोकशाही अधिक मजबूत होईल. माझ्यामुळे काय फरक पडणार? या उदासीन मानसिकतेऐवजी लोकशाही मजबूत करण्यासाठी माझी भूमिका काय? हा प्रश्न प्रत्येक नागरिकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. कारण लोकशाहीचे भविष्य केवळ सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर अवलंबून नसते; ते नागरिकांच्या जागरूकतेवर, सहभागावर आणि संविधाननिष्ठ वृत्तीवरही अवलंबून असते. नागरिक जागा झाला तर लोकशाही जागी राहते; नागरिक उदासीन झाला तर लोकशाहीची मुळे कमकुवत होऊ लागतात. म्हणूनच भारतीय लोकशाही अधिक सक्षम, समताधिष्ठित आणि न्यायपूर्ण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने केवळ मतदान करणारा मतदार न राहता जागरूक, विवेकी, प्रश्न विचारणारा आणि जबाबदार लोकशाही नागरिक बनणे, हीच आजच्या आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाची खरी गरज आणि काळाची हाक आहे.

# उमरखेडच्या मातीचा सुगंध पोहोचला लेह-लडाखच्या शिखरावर!

## प्रा.डॉ.अनिल काळबांडे यांना प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार

उमरखेड/प्रतिनिधी-ग्रामीण मातीत रुजलेलं एक स्वप्न जेव्हा आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकतं, तेव्हा तो केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर संपूर्ण तालुक्याचा गौरव असतो. अशीच अभिमानास्पद कामगिरी केली आहे उमरखेड तालुक्यातील मुळावा येथील साहित्य, शिक्षण आणि प्रबोधन क्षेत्रातील दीपस्तंभ प्रा. डॉ. अनिल काळबांडे यांनी लेह-लडाख येथे आयोजित भव्य आंतरराष्ट्रीय साहित्य संमेलनात डॉ. काळबांडे यांना प्रतिष्ठेचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

साहित्य, शिक्षण आणि सामाजिक प्रबोधन क्षेत्रातील त्यांच्या अखंड आणि उल्लेखनीय कार्याची ही जागतिक पातळीवर घेतलेली दखल आहे. ग्रामीण भागातून जागतिक क्षितिजाकडे झेप मूळचे ग्रामीण भागातील असलेल्या डॉ. काळबांडे यांनी महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख म्हणून काम करताना साहित्याची समृद्ध परंपरा जपली. केवळ मराठी साहित्यच नव्हे, तर फुले-शाहू-आंबेडकरांच्या समता, बंधुता आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांना त्यांनी आपल्या लेखणीतून घराघरात आणि देशाच्या सीमा ओलांडून जगभर पोहोचवले. सार्क संघटनेचे युवा दूत तथा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. मनीष गवई यांच्या संघटनेच्या वतीने हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. संमेलनाच्या



अध्यक्षा अरुणा सबाने आणि लेह विद्यापीठाच्या सर्व भाषा विभागाच्या डीन डॉ. तस्लीन झांगो यांच्या हस्ते डॉ. काळबांडे यांना शाल, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी महानगरपालिकेच्या माजी आयुक्त संगीता छायगुडे, शब्द संमेलनाचे प्रमुख संजय सिंगलवार, उपाध्यक्ष शशी डंभारे, डॉ. अजय नरवाडे, ज्येष्ठ छायाचित्रकार रमेश भागवत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉ. काळबांडे यांच्या या आंतरराष्ट्रीय सन्मानामुळे उमरखेड तालुका आणि औदुंबर नगरीच्या साहित्यिक वैभवात भर पडली आहे. त्यांच्या या यशाबद्दल ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रविचंद्र हडसनकर, प्रा. जगदीश कदम, प्राचार्य नागनाथ पाटील, डॉ. श्रीपाल सबनीस, अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.ग्रामीण भागात राहूनही जागतिक विचार करणाऱ्या आणि आपल्या लेखणीतून समाजाला नवी दिशा देणाऱ्या डॉ. अनिल काळबांडे यांचा हा सन्मान नव्या पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या भावी सरपंचांचे स्वप्न भंगले!

## कंधार तालुक्यातील १०० ग्रा.पं.च्या सरपंचपदाची नव्याने आरक्षण सोडत

कंधार/प्रतिनिधी-कंधार तालुक्यातील सरपंचपदाच्या आरक्षणाचा पेच पुन्हा एकदा निर्माण झाला असून, पूर्वी झालेल्या आरक्षण सोडतीला पूर्णविराम देत एकूण १०० ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची नव्याने आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. त्यामुळे आरक्षित जागेवर सरपंच होण्याचे स्वप्न उराशी बाळगून गावागावांत मोर्चेबांधणी सुरू केलेल्या इच्छुकांच्या आशेवर पाणी फेरले आहे. आता नव्याने कोणते आरक्षण पडणार, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

कंधार तालुक्यातील ९७ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी २०२५ ते २०३० या कालावधीचे आरक्षण दि.१ जुलै २०२५ रोजी कै. वसंतराव नाईक सभागृह (बचत भवन), पंचायत समिती कंधार येथे जाहीर करण्यात आले होते. यावेळी सरपंच, उपसरपंच, आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार कंधार रामेश्वर गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही आरक्षण सोडत पार पडली होती.या आरक्षण सोडतीनंतर अनेक इच्छुकांनी आपापल्या गावात सरपंचपदासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली होती. कोणत्या गटाला संधी मिळणार, कोण उमेदवारी करणार, याबाबत गावपातळीवर राजकीय गणिते आखली जात होती. काही भावी सरपंचांनी तर अक्षरशः गुडघ्याला बाशिंग बांधून तयारी सुरू केली होती.मात्र, त्यानंतर कंधार तालुक्यात शिराढोण ग्रामपंचायतीतून नाईक नगर, तसेच नागलगाव ग्रामपंचायतीतून उदातांडा आणि दुर्गातांडा या तीन नवीन ग्रामपंचायती अस्तित्वात आल्या. त्यामुळे नव्याने निर्माण झालेल्या ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला. परिणामी, पूर्वी झालेल्या आरक्षण सोडतीचा फेरविचार करण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. कंधार तालुक्यात पूर्वी ११६ ग्रामपंचायती कार्यरत होत्या. त्यात नव्याने अस्तित्वात आलेल्या तीन ग्रामपंचायतींची भर पडल्याने ग्रामपंचायतींची संख्या ११९ झाली आहे. यापैकी यापूर्वी आरक्षण सोडत झालेल्या ९७ आणि नव्याने निर्माण झालेल्या ३ अशा एकूण १०० ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची दुबार आरक्षण सोडत काढण्याचे आदेश प्राप्त झाल्याची माहिती आहे. त्यामुळे दि.१ जुलै २०२५ रोजी झालेल्या आरक्षण सोडतीत ज्या ग्रामपंचायतींना जे आरक्षण मिळाले होते, त्याच ठिकाणी आता कोणते आरक्षण पडणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. विशेषतः मागील आरक्षणानुसार सरपंचपदाची तयारी करणाऱ्या इच्छुकांची धाकधूक वाढली असून, नव्या आरक्षण सोडतीनंतर अनेकांचे राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता आहे.

### नव्या आरक्षण सोडतीकडे तालुक्याचे लक्ष

नव्याने होणाऱ्या आरक्षण सोडतीमुळे अनेक गावांतील राजकीय हालचालींना पुन्हा वेग येण्याची शक्यता आहे.आरक्षण बदलल्यास काही इच्छुकांना माघार घ्यावी लागू शकते, तर काही नव्या चेहऱ्यांना सरपंचपदाची संधी मिळू शकते. त्यामुळे गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या भावी सरपंचांचे स्वप्न टिकणार की भंगणार, याचा फैसला आता नव्या आरक्षण सोडतीनंतरच होणार आहे.

# ढोल-ताशांच्या गजरात देगलूरमध्ये गणरायाचे थाटात आगमन

देगलूर/प्रतिनिधी-गणेश चतुर्थीनिमित्त देगलूर शहरासह तालुक्यात लाडक्या गणरायाचे मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात आगमन झाले. सोमवार (दि.१४) रोजी सकाळपासूनच गणेशमूर्ती खरेदीसाठी शहरातील बाजारपेठेत भाविकांची मोठी गर्दी झाली होती. आपल्या चिमुकल्यांसह गणरायाची मूर्ती घेऊन घरी जाणाऱ्या नागरिकांमुळे संपूर्ण शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते.

देगलूर नगरपालिका हद्दीसह पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील विविध भागांत गणेश मंडळांची स्थापना करण्यात आली आहे. मंडळांच्या वतीने आकर्षक गणेशमूर्तींची ढोल-ताशांच्या गजरात आणि वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर विधिवत पूजा-अर्चा करून गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. अनेक नागरिकांनीही आपल्या घरी पारंपरिक पद्धतीने गणेशमूर्तीची भक्तिभावाने स्थापना केली. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत गणेशमूर्ती, पूजेचे साहित्य, सजावटीच्या वस्तू आणि फुलांच्या खरेदीसाठी नागरिकांची गर्दी दिसून आली. गणरायाच्या आगमनामुळे शहरातील विविध भागांमध्ये उत्साहाचे आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस व नगरपालिका प्रशासनाने गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत गणेशोत्सव काळातील विविध समस्या, नागरिकांच्या तक्रारी, मंडळांच्या सूचना तसेच आवश्यक उपाययोजनांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. प्रशासनाने उत्सव काळात नियमांचे पालन करून सहकार्य करण्याचे आवाहन गणेश मंडळांना केले.उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक वैभव पडवळकर यांच्या मार्गदर्शनात देगलूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बोलमवाड यांच्या नेतृत्वाखाली शहर व परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. गणेशोत्सव काळात गर्दीच्या ठिकाणी तसेच संवेदनशील भागांवर पोलिसांकडून विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे.

# तहसीलदारांचा आदेशही धाब्यावर;आरटीआय माहिती दडवल्याचा आरोप

## दत्तात्रय सज्जनांचा आमरण उपोषणाचा इशारा

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद येथील तहसील कार्यालयात माहिती अधिकार कायदा २००५ चा उघडपणे भंग होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.कार्यालयातील जन माहिती अधिकाऱ्यांनी कायदेशीर आदेशांना केराची टोपली दाखवल्यामुळे, सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय शंकर सज्जन यांनी प्रशासनाविरुद्ध थेट १६ सप्टेंबरपासून आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.या प्रकारामुळे तहसील कार्यालयात वीट भट्टी व्यवसायाबाबत मोठा गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार लपविण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय बळावला आहे.

सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय सज्जन यांनी १२ फेब्रुवारी २०२६ रोजी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत धर्माबाद शहरात सध्या कार्यरत असलेल्या वीट भट्टी व्यवसायिकांची संख्या, चालू वर्षात दिलेले परवाने आणि रद्द केलेल्या परवान्यांची नावे संकलित यादी मागितली होती. कायद्यानुसार ३० दिवसांच्या आत ही माहिती देणे बंधनकारक असतानाही संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही.तहसीलदारांच्या आदेशालाही जुमानले नाही! माहिती न मिळाल्याने अर्जदाराने ८ एप्रिल रोजी प्रथम अपील दाखल केले. यावर ६ मे रोजी सुनावणी झाली. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार मॅडम यांनी २० मे रोजी स्पष्ट आदेश देऊन, '८ दिवसांच्या आत अर्जदाराला माहिती उपलब्ध करून द्यावी' असे निर्देश दिले होते. मात्र, या आदेशाला तीन महिने उलटून गेले तरी अद्याप माहिती देण्यात आलेली नाही. याहून गंभीर बाब म्हणजे, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी अर्जदाराला सदर माहिती 'उच्च न्यायालयाच्या खंडपीठातून घ्यावी लागेल' असे सांगून दिशाभूल केल्याचा आरोप अर्जदाराने केला आहे. आरटीआय कायद्यात अशी कोणतीही अट नसताना नागरिकांची फसवणूक केली जात असल्याचे स्पष्ट होत आहे. या संपूर्ण गैरप्रकारामुळे संतप्त झालेल्या दत्तात्रय सज्जन यांनी वरिष्ठ पातळीवर पत्राद्वारे मागणी केली आहे की, संबंधित दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी आणि कायद्यानुसार २५,००० रुपयांचा दंड ठोठावण्यात यावा. जर १६ सप्टेंबरपर्यंत माहिती न मिळाल्यास धर्माबाद तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. यामुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.



प्रति वर्षाप्रमाणे यंदाही माजी आ.ईश्वरराव भोसीकर यांच्या कंधार येथील निवासस्थानी श्री गणरायाची प्राणप्रतिष्ठापना करुन आरती करतांना माजी आ.ईश्वरराव भोसीकर, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजय भोसीकर, माजी जि.प.सदस्या सौ.वर्षाताई भोसीकर, कृष्णाभाऊ भोसीकर, राधाताई भोसीकर, यशवंत पाटील भोसीकर आदी दिसत आहेत.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त प्रतिबंधात्मक आदेश लागू

नांदेड/प्रतिनिधी-मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी नांदेड शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये नांदेड शहरातील विविध भागांत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी १४ सप्टेंबर २०२६ रोजी हा आदेश जारी केला आहे. त्यानुसार दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपासून दि.१७ सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत उपोषण, आत्मदहन, धरणे, मोर्चा, रॅली, सत्याग्रह आदी आंदोलनात्मक कार्यक्रमांच्या आयोजनास प्रतिबंध करण्यात आला आहे. प्रतिबंधात्मक आदेशाची अंमलबजावणी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, महानगरपालिका कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, तहसील कार्यालय नांदेड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळामहात्मा गांधी पुतळा परिसर, पोलीस अधीक्षक कार्यालय, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय, शासकीय वैद्यकीय रुग्णालय, वजिराबाद परिसर तसेच माता गुजरीजी विसावा उद्यान परिसर यांसह संबंधित भागात राहणार आहे.तसेच शिवाजीनगर परिसर, आयटीआय चौक ते अण्णाभाऊ साठे चौक, कुसुम सभागृह ते रेल्वे स्टेशनकडे जाणारा रोड, २६ नंबर रोड तसेच शासकीय विश्रामगृह ते एसटी ओव्हर ब्रिजकडे जाणारा रस्ता या परिसरातही आदेश लागू करण्यात आला आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या अनुषंगाने विविध मागण्यांसाठी संपूर्ण नांदेड जिल्ह्यातून उपोषणार्थी, आत्मदहनार्थी व आंदोलक येण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने, सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हे प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. संबंधितांनी आदेशाचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# स्वच्छता,पिण्याचे पाणी व प्रवाशांच्या मूलभूत सुविधांची पूर्तता करा

## आ.राजेश पवार यांचे एसटी विभाग नियंत्रकांना पत्र

नायगाव/प्रतिनिधी-नांदेड मध्यवर्ती बसस्थानकातील प्रवाशांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांकडे तातडीने लक्ष देऊन आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी आ.राजेश पवार यांनी एसटी विभाग नियंत्रकांकडे पत्राद्वारे केली आहे.

नांदेड शहर हे मराठवाड्यातील महत्त्वाचे ऐतिहासिक, सांस्कृतिक, व्यापारी आणि राजकीय केंद्र असून ग्रामीण भागातून दररोज मोठ्या संख्येने नागरिक विविध कामांसाठी नांदेडला ये-जा करतात. यातील मोठा वर्ग एसटी बससेवेवर अवलंबून आहे. मात्र, मध्यवर्ती बसस्थानकातील काही मूलभूत सुविधांअभावी प्रवाशांना गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याचे आ.पवार यांनी पत्रातून निदर्शनास आणून दिले. बसस्थानकातील स्वच्छतागृहांमध्ये नियमित व पुरेशा पाण्याची व्यवस्था, दररोज स्वच्छता तसेच रात्री पुरेशी प्रकाश व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच प्रवाशांसाठी शुद्ध पिण्याचे पाणी नियमित उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या आहेत. बसस्थानक परिसरातील कचरा आणि दुर्गंधीचा तातडीने बंदोबस्त करून परिसर कायमस्वरूपी स्वच्छ ठेवावा. तसेच अधिकृत कॅन्टीनमध्ये प्रवाशांना योग्य दरात दर्जेदार चहा, नाश्ता, अल्पोपाहार व जेवण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही आ.राजेश पवार यांनी केली आहे.लालपरी ही सर्वसामान्य जनतेच्या प्रवासाचा महत्त्वाचा आधार आहे. गोरगरीब आणि ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या प्रमाणात एसटीवर अवलंबून आहेत. त्यामुळे प्रवाशांना त्यांच्या हक्काच्या मूलभूत सुविधा मिळायलाच हव्यात. प्रवाशांची गैरसोय आणि हेळसांड कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही. बसस्थानकातील सुविधांमध्ये आवश्यक सुधारणा होण्यासाठी वरिष्ठ पातळीवरही पाठपुरावा करण्यात येईल, अशी भूमिका आ.पवार यांनी व्यक्त केली.

### रामसिंग कुणा चव्हाण यांचे निधन

मुखेड/प्रतिनिधी-तालुक्यातील वसूर तांडा येथील ज्येष्ठ नागरिक रामसिंग कुणा चव्हाण (वय ८० वर्ष) यांचे दि.१४ रोजी स.१०:१५ वा. वर्धापकाळाने दुःखद निधन झाले आहे. रामसिंग चव्हाण यांच्या पार्थिवावर आज वसूर तांडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. स्वर्गीय रामसिंग चव्हाण यांच्या पश्चात ३ मुले, २ मुली, नातू नातवंडे असा मोठा परिवार आहे. अशोक चव्हाण गुरुजी, सुधाकर चव्हाण, कृषी अधिकारी राजू चव्हाण यांचे ते वडील होत.


CHANGE IN NAME

My New Name is Rizwana Begum Abdul Salam Which now I am changing as old name Rizvana Begum Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same

Address
W/o Abdul Salam 8-1-323 Milind Nager,
Mandhai, Itwara Nanded 431604

CHANGE IN NAME

My New Name is Shireen Fatema Mohammed Aqeel Which now I am changing as old name Shireen Fatima Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same

Address
W/o Mohammed Aqeel, 8-1-322 Milin Nager,
Mandhai, Itwara Nanded 431604

CHANGE IN NAME

My New Name is Sultana Begum Palke Wale Which now I am changing as old name Sultana Begum PalkiWale Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same

Address
W/o Mohammad Anees Palke Wale,
6-2-133 Palke wala Apartment,
Mohalla Sayyadan Masjid Sayyadan,
Itwara Nanded 431604

CHANGE IN NAME

My (old name) is **SUCHITA NANDKUMAR BHASKARAO MAHAJAN** which now I am, changing as (new name) **SUCHITA NANDKUMAR MAHAJAN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SUCHITA NANDKUMAR MAHAJAN**
R/o 1-17-1150, Hari om Visawa nagar
near Rest house Nanded-431602
Mob. No.9764311000

CHANGE IN NAME

My New Name is Parvez Ali Ishrat Ali Which now I am changing as old name Parvez Ali Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same

Address
S/o Ishrat Ali, 5-3-272 Arab Galli,
Nawaghat Holi, Itwara Nanded 431604

CHANGE IN NAME

My New Name is Mohammad Anees Mohammad Ramzan Which now I am changing as old name Mohammed Anees Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same

Address
S/o Mohammad Ramzan Palki Wale
6-2-133 Palki wala Apartment,
Mohalla Sayyadan Masjid Sayyadan
Itwara Nanded 431604

CHANGE IN NAME

My (old name) is **PATHAN JAVEED KHAN** which now I am, changing as (new name) **PATHAN JAVID KHAN IBRAHIM KHAN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**PATHAN JAVID KHAN IBRAHIM KHAN**
R/o H.no.B 98, Police colony
Shobha nagar, Nanded-431605
Mob. No.9657074761

CHANGE IN NAME

My (old name) is **SAWANT PRIYANKA SURESH** which now I am, changing as (new name) **PRIYANKA RAHUL THORAT**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**PRIYANKA RAHUL THORAT**
R/o Apurwa plaza flat no.205, Bhavsar chowk
Malegaon road Taroda bk Nanded-431605
Mob. No.8668519074

CHANGE IN NAME

My (old name) is **SUBHASH MAOHANRAO CHADAWAR** which now I am, changing as (new name) **SUBHASH MADHAVRAO CHADAWAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SUBHASH MADHAVRAO CHADAWAR**
R/o Rajendra nagar,
At Post Kinwat Dist Nanded
Mob. No.9764311000

CHANGE IN NAME

My old name is **BAUMER IRFAN** which now I changing as new name **IRFAN ABDUL REHMAN BAUMER** my all correspondance will be done As my new name please consider the same.

Address
Near ameer hamza masjid Barkat
pura waghi Road Nanded.
Mob. No.9561230523



## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष पी.ए.खंडारे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७२९/२०२६
बलबिरसिंघ वि.निरंक

अर्जदार : १. बलबीरसिंघ मोहनसिंघ मदतगार, वय : ५४ वर्षे, धंदा : रा.पि.मोहनसिंघ मदतगार, घर नं.१० सेक्टर नं.१९, अबचलनगर, सचखंड गुरुद्वारा,नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत मोहनसिंघ दरबारसिंघ मदतगार यांचे वारस आहेत. मयत मोहनसिंघ दरबारसिंघ मदतगार यांचा दिनांक २१/०३/२०१३ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये नमूद केले आहे की, अर्जदार हा मयताचा मुलगा आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक ०९/१०/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ११/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | ''आदेशावरुन'' |
| **कनिष्ठ लिपीक** | स्वाक्षरित/- |
| ५ वे सह दिवाणी न्यायालय | **सहा.अधिक्षक** |
| क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

# पिंपळगाव येथील सरकारी जमिन बेकायदेशीर विक्री करण्याचा घाट

## महसूल अधिकाऱ्यांच्या भूमिकेच्या चौकशीची मागणी

देगलूर/प्रतिनिधी- पिंपळगाव येथील गट क्र.३५ मधील तब्बल ३ हेक्टर ८० आर गायरान शासकीय जमीन बेकायदेशीरपणे तुकडे पाडून विक्री करण्याचा घाट सुरू असल्याचा खळबळजनक आरोप शिवसेनेचे युवा जिल्हाप्रमुख नामदेव थडके पाटील यांनी केला आहे. या प्रकाराची माहिती महसूल यंत्रणेला वारंवार देऊनही कारवाई होत नसल्याने महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करावी आणि संबंधित जमीन तातडीने शासनाने ताब्यात घ्यावी, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पिंपळगाव येथील गट क्र.३५ मधील ३ हेक्टर ८० आर गायरान शासकीय जमीन खाते क्र.७६३ नुसार धमशाभाई मारोती जाधव व इतर यांच्या नावे देण्यात आली आहे. मात्र, शासनाच्या नियमानुसार जमिनीचा उपभोग घेण्याऐवजी काही जणांकडून या शासकीय जमिनीवर डोळा ठेवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे संबंधित गायरान जमिनीवर जेसीबीच्या सहाय्याने माळरान साफ करून जमिनीचे तुकडे पाडणे, बॉण्ड नोटरी करून विक्री करण्याचा घाट घालणे सुरू असल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे. त्यामुळे शासकीय गायरान जमीन हळूहळू खासगी भूखंडांच्या विळख्यात जाण्याची शक्यता निर्माण आहे. या प्रकाराची माहिती स्थानिक महसूल यंत्रणेला वारंवार देण्यात आली. प्रत्यक्ष भेटी तसेच भ्रमणध्वनीद्वारे संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास बाब आणूनही अपेक्षित कारवाई होत नसल्याचा आरोप निवेदनात आहे. उलट काही महसूल कर्मचारी व अधिकाऱ्यांशी आर्थिक देवाणघेवाण करून प्रकरणाला अर्थपूर्ण विलंब लावला जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. शासकीय गायरान जमीन ही सार्वजनिक हितासाठी असताना तिच्यावर अशा पद्धतीने खासगी व्यवहाराचा प्रयत्न होत असेल तर हा प्रकार गांभीर्याने तपासण्याची गरज आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी गट क्र.३५ ची प्रत्यक्ष पाहणी करून जमिनीवरील सद्यस्थिती कागदपत्रे व विक्री व्यवहारांची चौकशी करावी अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच चौकशीत गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करून गायरान जमीन शासन ताब्यात घ्यावी अशी मागणी थडके पाटील यांनी केली आहे.या प्रकरणात प्रशासनाने विलंब केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

# बेल्लूर,जाफलापूर येथील प्रलंबित मागण्यांसाठी उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

धर्माबाद/प्रतिनिधी-बाभळी प्रकल्पबाधित मौजे बेल्लूर खुर्द आणि जाफलापूर या पुनर्वसन गावांच्या प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाने सातत्याने दुर्लक्ष केल्यामुळे गावकऱ्यांचा संयम सुटला आहे. वारंवार लेखी निवेदने देऊनही न्याय मिळत नसल्याने, अखेर आज (मंगळवार) दि.१५ सप्टेंबरपासून उपोषणकर्ते संतोष मनोहर जाधव व गंगाधर अशोक जाधव यांनी धर्माबाद येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

बाभळी धरण प्रकल्पामुळे बाधित झालेल्या बेल्लूर खु. आणि जाफलापूर या गावांचे पुनर्वसन झाल्यापासून आजतागायत गावकऱ्यांना केवळ नरकयातना सहन कराव्या लागत आहेत. या दोन्ही गावांना हक्काच्या नागरी सुविधा मिळवून देण्यासाठी संतोष मनोहर जाधव व गंगाधर अशोक जाधव यांनी थेट उपविभागीय कार्यालयाच्या प्रांगणात ठिय्या मांडला आहे. गावात सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था नसल्याने आणि लहान मुलांसाठी अंगणवाडी नसल्याने नागरिकांचे हाल होत असल्याचा पाढा उपोषणकर्त्यांनी वाचला.शासकीय विकास निधी बेल्लूर खुर्द व जाफलापूर गावांच्या विकासासाठी शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, गावातील अंतर्गत रस्ते तसेच गावाबाहेरील मुख्य रस्त्यालगत सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी मोठ्या सीसी नालीचे बांधकाम मंजूर करावे, स्मशानभूमीची हक्काची शासकीय जागा उपलब्ध करून देऊन तिथे शेड व इतर बांधकाम मंजूर करण्यात यावे, गावातील लहान मुलांच्या शिक्षणासाठी व पोषणासाठी नवीन अंगणवाडी मंजूर करून तिच्या इमारतीचे बांधकाम करावे, जिल्हा नियोजन समितीचा निधी गावातील रस्ते, शाळा, समाजमंदिर आणि नियमित वीज व पाणी पुरवठ्यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून विशेष निधी तातडीने मंजूर करावा व अन्य मागण्यांसाठी आमरण उपोषण संतोष जाधव व गंगाधर जाधव यांनी सुरु केले. उपोषणस्थळी बेल्लूर व जाफलापूर परिसरातील गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाठिंबा दर्शवीला आहे.



नविन मोंढा येथील एकता नवरात्र नव दूर्गा महोत्सव मंडळातर्फे यंदा अंजनीगिरी पर्वताचा देखावा तयार करण्यात येणार असून त्या कामाचे भूमिपुजन आ.बालाजी कल्याणकर यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आले. यावेळी आ.अमरनाथ राजूरकर, माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, मंडळाचे अध्यक्ष नवल पोकर्णा व इतर उपस्थित होते.

# महिलेचे गंठन लंपास

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड ते लोहा एस.टी.महामंडळाच्या बस प्रवासामध्ये एका महिलेच्या पर्समधून अज्ञात चोरट्यांनी सोन्याचे गंठन लंपास केल्याची घटना गेल्या आठवड्यात घडली आहे.

चंद्रकांत केशवराव हजारे (वय ५२) रा.वाशीम यांच्या पत्नी ह्या दि.८ सप्टेंबर रोजी नांदेड ते लोहा असा बसमध्ये प्रवास करीत असतांना अज्ञात चोरट्याने त्यांच्या पत्नीच्या पर्समधील ८० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे गंठन चोरुन नेले आहे. चंद्रकांत हजारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन लोहा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# स्वतंत्र धर्म कोडसाठी आदिवासी समाज एकवटणार; किनवटमध्ये २० सप्टेंबरला धर्म चिंतन परिषद

किनवट/प्रतिनिधी-आदिवासी समाजाची सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक ओळख अबाधित राखण्यासाठी, तसेच ऐतिहासिक हक्कांचे स्मरण करण्यासाठी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद (नवी दिल्ली) जिल्हा शाखा नांदेड आणि तालुक्यातील विविध आदिवासी समाज संघटनांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी, २० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता 'आदिवासी धर्म चिंतन परिषद' आणि 'आदिवासी क्षेत्रबंधन मुक्ती दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा गोकुंदा रोड किनवट येथील एन.के.गार्डन मंगलाकार्यालयात संपन्न होणार आहे.

अ.भा.आ.वि.प.चे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष ॲड. शिवरामजी मोघे, ॲड.रामजी टोपे (प्रदेशाध्यक्ष, आदिवासी कनिष्ठ कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य) प्रमुख मार्गदर्शक: इंजि. दशरथ मडावी (संस्थापक अध्यक्ष, आदिवासी क्रांती सेना) प्रमुख अतिथी म्हणूनशंकरलालजी बोदाडे (अध्यक्ष, अ.भा.आ.वि.प., जि. यवतमाळ), बापूरावजी सोयाम (माजी आमदार, आसिफाबाद, तेलंगणा) प्रा. आ.वेदमा भोजू पटेल (आमदार, खानपूर, तेलंगणा) रामभाऊ चव्हाण (माजी जि. प. अध्यक्ष, यवतमाळ), याशिवाय महाराष्ट्र, तेलंगणा व मध्य प्रदेशातील लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध आघाड्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. आगामी २०२१ च्या जनगणनेत आदिवासी समाजासाठी स्वतंत्र धर्म कोड उपलब्ध असावा, ही या परिषदेची मुख्य मागणी आहे. भारतात सुमारे १४ कोटींपेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असतानाही स्वतंत्र धर्म कोड नसल्यामुळे समाजाची सांस्कृतिक ओळख व परंपरा दुर्लक्षित होत आहेत. या विषयावर चिंतन करून जनजागृती घडवून आणणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. १९५६ पूर्वी आदिवासींना मिळणाऱ्या शासकीय सुविधा व सवलती तत्कालीन 'क्षेत्रबंधन' कायद्यामुळे विशिष्ट क्षेत्रापुरत्याच मर्यादित होत्या. तत्कालीन खासदार स्व. शिवाजीराव मोघे यांच्या प्रयत्नांमुळे व संसदेतील आंदोलनामुळे १८ सप्टेंबर १९५६ रोजी या कायद्यात सुधारणा झाली आणि संपूर्ण महाराष्ट्रातील आदिवासींना त्यांचे हक्क मिळाले. या ऐतिहासिक विजयाचे स्मरण म्हणून १८ सप्टेंबर हा दिवस 'क्षेत्रबंधन मुक्ती दिन' म्हणून पाळला जातो.आदिवासी समाजातील सर्व नागरिक, युवा कार्यकर्ते, महिला आणि विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी या चिंतन परिषदेस व क्षेत्रबंधन मुक्ती दिन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन अ.भा.आ.वि.प.चे नांदेड जिल्हाध्यक्ष प्रकाश (मा.प्रा.) विजय खुपसे यांच्यासह जिल्हा व तालुका पातळीवरील सर्व निमंत्रक व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# १७ सप्टेंबरच्या मंत्रिमंडळ बैठकीत मराठवाड्यासाठी विशेष पॅकेज जाहीर करा

## खा.रवींद्र चव्हाण यांची राज्य सरकारकडे मागणी

नांदेड/प्रतिनिधी-मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर दि. १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत विभागातील दुष्काळी परिस्थिती आणि विकासाच्या प्रश्नांवर तातडीने ठोस निर्णय घेण्यात यावेत, अशी मागणी खा.रवींद्र चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात खा.रवींद्र चव्हाण यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दि. १५ सप्टेंबर रोजी पत्र पाठविले आहे. मराठवाड्यात सध्या निर्माण झालेली दुष्काळजन्य परिस्थिती गंभीर असून त्याचा मोठा फटका शेतकरी, शेतमजूर तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसत असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. मराठवाड्यातील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून याबाबत शासनाला माहिती देण्यात आली आहे. मात्र, आता परिस्थिती अधिक गंभीर होत असल्याने मंत्रिमंडळाच्या बैठकीत तातडीने ठोस निर्णय घेणे आवश्यक असल्याचे खासदार चव्हाण यांनी स्पष्ट केले. बैठकीत मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत, पीक नुकसानभरपाई, पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि रोजगाराच्या उपाययोजना याबाबत तातडीने निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. दुष्काळाचा वाढता परिणाम लक्षात घेऊन शेतकरी व ग्रामीण भागाला शासनाकडून ठोस दिलासा मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दुष्काळ निवारणासोबतच मराठवाड्याच्या दीर्घकालीन विकासासाठी सिंचन, पाणी, उद्योग, रोजगार आणि पायाभूत सुविधांना चालना देणाऱ्या योजनांना प्राधान्याने मंजुरी द्यावी. मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचे तत्काळ पुनर्गठन करून सक्षम अंमलबजावणी यंत्रणा उभी करावी, अशीही मागणी त्यांनी पत्रातून केली आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता मराठवाड्याच्या प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याचा दिवस ठरावा, अशी अपेक्षा व्यक्त करत दि. १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत वरील सर्व प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्यात यावेत, अशी आग्रही मागणी खा.रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी केली आहे.

# कासराळीत पुरुषोत्तम पाटील महाराजांच्या कीर्तनाला दहा हजार भाविकांची उपस्थिती

नायगाव/प्रतिनिधी-कासराळी (ता.बिलोली) येथे स्व.मनोहरराव लोकमनवार यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्त हभप पुरुषोत्तम पाटील महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. या कीर्तनाला नायगाव, बिलोली, देगलूर, नरसी, नांदेडसह परिसरातून सुमारे १० हजार भाविकांची विक्रमी गर्दी झाली.

आई-वडिलांची सेवा हीच खरी पंढरीची वारी असा संदेश देत हभप पुरुषोत्तम पाटील महाराज यांनी मातृ-पितृ सेवा, संस्कार व कुटुंबव्यवस्थेचे महत्त्व पटवून दिले. टाळ-मृदुंगाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.कार्यक्रमास बालाजी पा. खतगावकर, माजी आ.राम पा. रातोळीकर, माजी आ.सुभाषराव साबणे, शिवराज पा. होटाळकर, मीनल पा. खतगावकर, राजेश कुंटूरकर, बालाजी बच्चेवार, श्रावण पा. भिलवंडे, माणिकराव लोहगावे, यादरावजी तुडमे, विजय कुंचनवार, बिराजदार गुरुजी, संग्राम पा. हायगले, चंदू पा. सावळेकर, धनराज शिरोळे, सूर्याजी चाळकर, वसंत सेठ मेडेवार, राजेश्वर मेडेवार, सदानंद बेडेवार, गंगाधर सेठ कटकमवार, ज्ञानेश्वर चिद्रेवार, मनोज आरगुरलवार, बाळासाहेब पांडे, नरेंद्र येरावार, सुरेश लंगडापुरे, अजित शेठ उत्तरवार, शिवाजी पाटील वडजे, कृष्णा दमकोंडवार, अविनाश पाटील पवार, अण्णासाहेब पाटील पवार, संजय पाटील मोरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट देऊन उपस्थिती लावली.

## जाहीर प्रगटन

मा.श्री.ए.जी.चव्हाण, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नांदेड
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०६७/२०२६
रामराव व इतर विरुध्द निरंक

अर्जदार : १. रामराव पि.राघुजी सोनटक्के, वय : ५५ वर्षे, धंदा : मजुर, २. प्रकाश पि.राघुजी सोनटक्के, वय : ५३ वर्षे, धंदा : मजुर, ३. दिलीप पि.राघोजी सोनटक्के, वय : ५२ वर्षे, धंदा : मजुर, सर्व रा. नंदीग्राम सोसायटी,नांदेड, ४. श्याम पि.राघोजी सोनटक्के वय : ५५ वर्षे, धंदा : मजुर, रा.जय हनुमान सोसायटी धनेगाव, सिडको,नांदेड, ५. शेषाबाई भ्र.रावसाहेब गायकवाड, वय : ६४ वर्षे, धंदा : घरकाम, ६. कोंड्याबाई भ्र.सटवाजी गायकवाड, वय:६३ वर्षे, धंदा : घरकाम, दोघे रा. शिराढोण, ता.कंधार, जि.नांदेड, ७. अरुणाबाई भ्र.शिवाजी भिसे वय : ५४ वर्षे, धंदा : घरकाम, रा.उस्मानाबाद, ता.कंधार, जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेग्यूलेशन ऑक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ते ७ यांनी कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदार हे मयत राघोजी पि. इरबा सोनटक्के व किशनबाई भ्र.राघोजी सोनटक्के यांचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र.१ ते ७ ही त्यांची अपत्ये आहेत. त्यांचा मृत्यू अनुक्रमे दिनांक २२/११/२०१७ व १७/०९/२०१८ रोजी नांदेड येथे झाला, त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र नांदेड महानगरपालिकने निर्गमित केले असून त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती प्रस्तुत संचिकेत दाखल करण्यात आलेल्या आहेत. अर्जदाराच्या अर्जदाराशिवाय मयेतास कोणीही वारस नाही, असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदारास शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयीन कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार यांना मयत राघोजी पि. इरबा सोनटक्के व किशनबाई भ्र. राघोजी सोनटक्के यांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात दिनांक १९/१०/२०२६ पर्यत किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत हजर राहून आक्षेप नोंदवावा / सादर करावा. या तारखेनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्ज एकतर्फी निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटन आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
७ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

# किनवट संविधानाच्या पलीकडे आहे का?

## महामार्ग अतिक्रमण हटावसाठी संघर्ष समितीचा आमरण उपोषणाचा इशारा

किनवट/प्रतिनिधी-राष्ट्रीय महामार्ग १६१-ए च्या कोठारी ते आय्यप्पा स्वामी मंदिरापर्यंतच्या मार्गावरील अतिक्रमणे तात्काळ हटवण्यात यावीत, अन्यथा २ ऑक्टोबर पासून उपविभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा राष्ट्रीय महामार्ग रस्ता रुंदीकरण संघर्ष समितीने दिला असून सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांना तशा आशयाचे निवेदन देले आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश १३ एप्रिल २०२६, महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिव कार्यालयाचे आदेश २२ जुलै २०२६ आणि नांदेड जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश २५ ऑगस्ट २०२६ या सर्वांचा दाखला देत संघर्ष समितीने महामार्ग प्राधिकरण आणि किनवट नगरपरिषद प्रशासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.मराठवाड्यात अतिक्रमण हटाव मोहीम चालू असली तरी पण यामध्ये किनवट अपवाद का? असा सवाल व्यक्त केला आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी संभाजीनगर येथे घेतलेल्या बैठकीनंतर संपूर्ण मराठवाड्यात राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे हटवण्याची मोहीम वेगाने सुरू आहे. मात्र, किनवट शहर आणि तालुक्यात अद्याप किमान साधी सूचना सुद्धा दिलेली नाही. किनवट हे संविधान आणि कायद्याच्या पलीकडे आहे का? असा थेट सवाल सामान्य जनतेकडून उपस्थित केला जात आहे. शासकीय इमारती नियमानुसार, मग अनधिकृत बांधकामांवर मेहेरबानी कशासाठी विभागीय आयुक्त जी.श्रीकांत हे किनवट येथे कार्यरत असताना त्यांनी रस्ता मध्यभागापासून १८ मीटर अंतर सोडून क्रीडा संकुलाची भिंत उभारली होती. तसेच नगर परिषद, तहसील कार्यालय, दिवाणी न्यायालय आणि जिल्हा परिषद व्यापारी संकुलाचे बांधकामही १८ मीटर अंतर सोडून नियमानुसारच झालेले आहे. तरीही बस स्थानक परिसर, गोकुंदा, अशोकस्तंभ, जिजामाता चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात अनेकांनी रस्त्यावर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकामे व टपऱ्या थाटल्या आहेत आणि त्या भाड्याने दिल्याचे निवेदनात म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालय व राज्य शासनाच्या आदेशानुसार लवकरात लवकर नोटीस बजावून कोठारी ते आय्यप्पा स्वामी मंदिरापर्यंतचा महामार्ग अतिक्रमणमुक्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. मागणी मान्य न झाल्यास २ ऑक्टोबर रोजी उपविभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा व्यंकट भंडारवार, वैजनाथ करपुडे, बाबुराव ओदीवार, अनिल कऱ्हाळे यांनी दिला आहे.

पान १ वरुन

### राज्य सरकारकडून दुष्काळाच्या...

शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील. शेतकऱ्यांना संपूर्ण जी मदत अशा काळामध्ये केली पाहिजे, ती सगळी मदत करण्याची तयारी राज्य शासनाची आहे आणि त्या संदर्भात आज चर्चाही केली आहे. त्याचा आराखडाही तयार करायला सांगितलेला आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### मुखेड,कंधारमध्ये दुष्काळ जाहीर...

संख्येने मुखेड तहसील कार्यालयाच्या पायऱ्यांवर जमा झाल्याने या आंदोलनाला मोर्चाचे स्वरूप प्राप्त झाले. नांदेड जिल्ह्यासह मुखेड-कंधार तालुक्यात दुष्काळ जाहीर करून सर्व दुष्काळी सवलती लागू कराव्यात, दुष्काळामुळे नुकसान झालेल्या पिकांना पीकविमा लागू करावा, चालू कर्जदार शेतकऱ्यांना थकीत कर्जदारांप्रमाणे दोन लाख रुपयांची कर्जमाफी किंवा प्रोत्साहनपर रक्कम द्यावी, विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क तसेच प्रवेश शुल्क माफ करावे, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या. शेतकऱ्यांना वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याने वीजपुरवठ्याचा कायमस्वरूपी प्रश्न सोडवावा. दुष्काळामुळे शेतीवर अवलंबून असलेल्या मजुरांना काम उपलब्ध करून द्यावे किंवा अनुदान द्यावे. निराधार, अपंग व दिव्यांगांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवून त्यांच्या खात्यात अनुदान जमा करावे, अशीही मागणी करण्यात आली.

# राष्ट्रीय लोकअदालतीत ६९ प्रकरणे निकाली;४ कोटी रुपयांची वसुली

कंधार/प्रतिनिधी-कंधार येथील न्यायालयात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, या लोकअदालती-मध्ये विविध स्वरूपाची एकूण ६९ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, मोटार अपघात, गुन्हा कबुली व दिवाणी दाव्यांमधून तब्बल ४ कोटी ६ लाख १४ हजार ३५७ रुपयांची वसुली करण्यात आली असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

जिल्हा न्यायाधीश-२ ए.पी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१२ रोजी सकाळी ११:०० वाजता राष्ट्रीय लोकअदालतीच्या कामकाजास प्रारंभ झाला. यात टेबल क्रमांक १ वर जिल्हा न्यायाधीश-२ ए.पी. कुलकर्णी, तर टेबल क्रमांक २ वर दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर के.एस.खंडारे यांनी प्रकरणांचे कामकाज पाहिले. पॅनल सदस्य म्हणून ॲड.अभय देशपांडे व ॲड.एस.एस.मुसळे यांनी काम पाहिले. लोकअदालतीच्या माध्यमातून पक्षकारांना परस्पर सामंजस्याने प्रकरणे निकाली काढण्याची संधी मिळाल्याने अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रकरणांवर समोपचाराने तोडगा निघाला. न्यायालयीन प्रक्रियेतील वेळ व खर्चाची बचत होऊन पक्षकारांना जलद न्याय मिळण्यास लोकअदालतीची चांगलीच मदत झाली. यावेळी कंधार तालुका अभिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. बी.के.पांचाळ, ॲड. दिगंबर गायक्वाड, ॲड. हफीज घडीवाला, ॲड. एन.डी. कोळनुरकर, ॲड. मोरे, ॲड.मुखेडकर, ॲड. गवाले, ॲड.सुहास मस्के, ॲड. उमर शेख, ॲड. आर. डी. कुलकर्णी, ॲड.शेख जावेद, ॲड.सुनील फुके आदी उपस्थित होते. जिल्हा न्यायालयाचे सहायक अधीक्षक आर. के. गवळी यांच्यासह इतर जणांनी लोक अदालतीच्या कामासाठी परिश्रम घेतले.

### एसजीएसच्या गलथान कारभाराचा...

नांदेडमध्ये प्रवेश मिळेल, या आशेने विद्यार्थी व पालक महाविद्यालयात दाखल झाले. मात्र, दुपारी दोन वाजता सुरू होणे अपेक्षित असलेली प्रवेश प्रक्रिया तब्बल पावणेचार वाजता सुरू झाली आणि साडेपाच वाजता बंद झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेशासाठी अत्यंत अपुरा वेळ मिळाला. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक आणि महाविद्यालय प्रशासनाच्या विलंबाचा फटका अनेक विद्यार्थ्यांना बसला. जागा उपलब्ध असूनही केवळ वेळेअभावी प्रवेशाची संधी हुकल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.या प्रकरणात महाविद्यालय प्रशासनाच्या गलथान कारभाराची कसून चौकशी करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने कॉ. प्रदीप नागापूरकर, कॉ. शिवाजी फुलवळे आणि कॉ. देवराव नारे यांनी केली आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४